THE MAGIC OF ROTARY

Club No. 26272

RI District 3131

Rotary

Issue No. 3 : September 2024

# PRATIMA

**BulletinofRotaryClubofPuneKothrud**

President
Rtn. Manish Didmishe

Editor
Ann Rekha Pandit

Hon. Secretary
Rtn. Rahul Khandekar



## Basic Education and Literacy

*Meetings:*
*Every Tuesday, 7 pm - 8:30 pm*
*Damle Hall, Law College Road, Pune*

*Contact us:*
*rotarykothrud@gmail.com*
*http:\\rcpunekothrud.rotary3131.org*

# PRESIDENT'S MESSAGE



Dear Rotarians and Partners,

Greetings!

I am pleased to share that our club has sustained its momentum throughout August, with significant advancements in our initiatives. Our teacher training programs at BJS Wagholi and Mamasaheb Mohol College exemplify our unwavering dedication to enhancing literacy.

This month, we introduced a new dimension to our educational offerings with the subject "Innovation, Entrepreneurship, and Social Impact: Transforming Ideas into Reality with Purpose." This addition reflects our commitment to providing impactful and forward-thinking topics.

Additionally, we had the honor of participating in the Synergy RYLA event in collaboration with RC Pune Katraj and RC Pune Tilak Road. Our trainers, including Past President Ujwal Tawde, Rotarian Dr. Vishal Sardeshpande, Rotarian Urmila Haldankar, Past President Satyajit Chitale, Past President Sumedha Bhosale, and Partner Umesh Kulkarni, have delivered exceptional contributions as faculty members at these events.

Our Study Skill workshops and Relationship Counselling programs led by Rtn. Urmila Haldankar & team continue to make a significant impact. We are proud to report that a record 350 students from BJS School participated in the Study Skill workshop. Additionally, we have launched a distinctive knowledge series, "Lakshya," for students at Chandrakant Darode School. This series, initiated by Past President Dr. Vishwanath Lele and Past President Vija Raikar, aims to provide vocational guidance through interactions with professionals from diverse fields. The inaugural lecture was delivered by Colonel Kalyani Deshpande, who shared valuable insights on joining the Indian Army and life in the armed forces, offering students real-life examples and practical advice.

We plan to continue this series with forthcoming sessions featuring distinguished guests from the IPS, IAS, industry, sports, and other professions.

Furthermore, our commitment to supporting underprivileged students is reflected in our continued relation through Interact Clubs at Erandwane School and Shishuvihar School. These initiatives underscore our dedication to making a positive difference in the lives of needy students. The successful installation of Interact Clubs was managed admirably by Past President Vija and Partner Swati, who have been crucial in maintaining effective communication between our club and the schools.

Our weekly programs have continued to offer a rich blend of variety, entertainment, and valuable knowledge sharing. Notable events this month included screening of the movie Gharat Ganapati with fellowship, a compelling lecture on Spiti Valley by Rotarian Neena, and a unique session on Dance Movement Therapy. Each of these programs was distinct and contributed to an engaging and enjoyable experience for our members. All credit to Partner Shobha and the Program Committee, as well as Partner Bhakti and the Fellowship Committee, for their exceptional efforts in organizing these events. Their dedication and hard work have been instrumental in ensuring the success and enjoyment of our weekly gatherings.

We successfully executed the "Chatra Chhaya" project, which involved distributing large umbrellas to street vendors to provide protection from rain and sun. This project is part of the district initiative, "Playing 11."

The activity brought significant satisfaction and joy to all involved, highlighting the impact of our collective efforts in giving back to the community. Special recognition is due to Rotarian Hemchandra Date for his exemplary coordination and logistical support, which were crucial to the successful execution of this project.

Our most prestigious event, the "Rotary Excellence Award Program 2024," was successfully held this month. We had the honor of recognizing Guru Shamatai Bhate as the REAP Awardee and Ms. Ameera Patankar as the Rising Star Awardee. The esteemed Taalyogi Pandit Suresh Talwalkar was the chief guest for this distinguished occasion.

The event was executed with remarkable proficiency, and I would like to extend our heartiest congratulations to the entire REAP team. Special thanks are due to Rotarian Rajesh Bhate and Partner Swati Bhate for their exceptional leadership and dedication, which were instrumental in the success of this program. The outstanding efforts of entire team of REAP have set a new standard for excellence, and they truly deserve a standing ovation.

I am pleased to acknowledge the exceptional work carried out by the Public Image Committee, led by Rotarian Hemchandra Date. Their tireless efforts throughout the month have ensured comprehensive coverage of our events and projects across major newspapers, social media platforms, and YouTube. Their consistent and brilliant work has significantly enhanced our public image.

As we enter September, which is celebrated as Literacy Month in Rotary, our club is fully prepared to engage in a variety of impactful activities. We will be conducting Teacher Support programs, inaugurating a new Rotary Community Corps (RCC), and participating in the district Literacy Seminar.

We look forward to a dynamic and fulfilling month ahead, filled with impactful projects, engaging programs, and valuable fellowship events. I encourage all members to actively support these initiatives by attending and participating in our events, thus motivating and assisting both our teams and the beneficiaries.

Thank you.

**Rtn. Manish Didmishe**
President 2024-25

# Editorial



My Dear Rotarians & Partners,

The Rotary theme for this month is, 'Basic Education & Literacy', a very important aspect and symbol of a progressive society.

As per the available statistics, more than 775 million people over the age of 15een are illiterate in the world i.e. approximately 17% of the world's adult population is illiterate. This is an alarmingly significant number that calls for immediate action by people like, we the Rotarians who consider ourselves responsible for the wellbeing of the society.

The goal of Rotary is to strengthen the capacity of communities to support basic education & literacy, reduce gender disparity in the field of education and increase the percentage of adult literacy.

Towards this goal, we the Rotary Club of Pune, Kothrud sincerely take a lot of efforts in the field. Through various projects that we undertake & participate, we try to actively pursue this goal. Our team of Rotarians & Partners led by PP Rtn. Ujwal Tawde, Rtn. Urmila Haldankar and others are making tremendous efforts/wok in this field by conducting various projects in schools as well as in remote villages to promote adult literacy.

This month's cover page of our Pratima therefore is reflecting this important aspect of the Rotary Theme.

While I address you here, I realize that this month onwards the festive season of the year has begun with great enthusiasm & funfair. The Gokulashtami is over and the most sought festival of the Punekar's namely Lord Ganesh Festival has started. This will be followed by Dashera, Diwali, X Mas and the New Year. Thus, now on the next few months will bring a lot of joy to all of us. I would therefore close with my very best wishes to you all for a happy, healthy, wealthy and most happening exciting festive season.

**Rekha Pandit.**

Partner & Editor Pratima.

## छत्रछाया उपक्रम :

## रोटरी क्लब ऑफ पुणे कोथरूडने २० गरजू विक्रेत्यांना दिल्या छत्र्या

रोटरी क्लब ऑफ पुणे कोथरूडने १६ ऑगस्ट रोजी एक महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रम राबवला. 'playing 11 अंतर्गत छत्र छाया' या उपक्रमांतर्गत, क्लबने२० गरजू विक्रेत्यांना दिली. छाया छत्र्या वितरित केल्या. यामुळे या विक्रेत्यांच्या जीवनात एक सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या उपक्रमात क्लबचे अध्यक्ष प्रेसिडेंट मनीष दिडमिशे, PI डायरेक्टर रोटरी अन. हेमचंद्र दाते, रोटरी अन सुहास पटवर्धन, पास्ट प्रेसिडन्ट प्रशांत सिद्ध, रोटरी अन रत्नाकर नारगीलकर आणि रोटरीच्या सर्विस प्रोजेक्ट डायरेक्टर रोटरी अन सुषमा कुलकर्णी उपस्थित होते.

शहरातील विविध भागांमध्ये, विशेषत: पेठांमध्ये हा उपक्रम राबवला गेला. यामुळे गरीब आणि गरजू विक्रेत्यांना थोडक्यात पण महत्त्वपूर्ण सहाय्य मिळाले. छत्रे वितरित करून, या विक्रेत्यांच्या दैनंदिन जीवनात सोईची भर घालण्यात आली.

रोटरी क्लब ऑफ पुणे कोथरूडच्या या उपक्रमाचे स्वागत सर्वच स्तरांवर करण्यात आले असून, यामुळे सामाजिक दायित्वाच्या जाणिवेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे आणि समाजातील गरजू वर्गाला आवश्यक मदतीचा हात देण्याचे कार्य साधता आले.

On August 16, the Rotary Club of Pune Kothrud organized an important social initiative under 'Playing 11' under 'chhatra chhaya. As part of this initiative, the club distributed umbrellas to 20 needy vendors, aiming to bring a positive change in their lives.

The event was attended by club President Manish Didmish, PI Director Rtn. Hemchandra Date, Rtn. Suhas Patvardhan, Past President Prashant Siddh, Rtn. Ratnakar Naragilkar, and club's Service Project Director Rtn. Sushma Kulkarni.

The initiative was carried out across various parts of the city. This effort provided significant yet essential assistance to impoverished and needy vendors. By distributing umbrellas, the club aimed to add comfort to the daily lives of these vendors.

The Rotary Club of Pune Kothrud's initiative has been welcomed at all levels, highlighting a greater awareness of social responsibility and the commitment to extending a helping hand to the underprivileged in society.

**- Partner Swati Bhate.**

# रोटरी गुणवत्ता पुरस्कार






रोटरी क्लब ऑफ कोथरूड पुणेतर्फे देण्यात येणारा रोटरी सर्वोत्तम गुणवत्ता पुरस्कार समारंभ १४ ऑगस्ट रोजी पुण्यात संपन्न झाला. यंदाचे पुरस्काराचे ३३ वे वर्ष असून या वर्षी हा पुरस्कार कथक नृत्य पंडिता विदुषी शमा भाटे यांना देण्यात आला. पद्मश्री तालयोगी सुरेशजी तळवलकर हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. त्याचप्रमाणे कथक नृत्यातील उदयोन्मुख कलाकार अमीरा पाटणकर यांना रायझिंग स्टार या पुरस्काराने गौरविण्यात आले. हा कार्यक्रम मराठा चेंबर ऑफ कॉमर्स च्या सेनापती बापट पथावरील सुमंत मुळगावकर सभागृहात पार पडला.

कोणताही पुरस्कार स्वीकारताना मन सुखावून जाते परंतु आपण निवडलेल्या क्षेत्रात अधिक नेत्रदीपक कार्य करण्याची समाजाने दिलेली ती जबाबदारी असते असे पुरस्कार प्रदान कार्यक्रमानंतर प्रेक्षकांना संबोधित करताना पंडिता शमाताई यांनी सांगितले. आपल्याला लाभलेल्या गुरु रोहिणीताई भाटे, तालयोगी सुरेशजी तळवलकर व अनेक गुरूंकडून नृत्यनिष्ठा आणि रियाझ हा महत्त्वाचा गुण आपल्याला मिळाला असे त्यांनी विशद केले.

विद्यार्थी–शिष्य–गुरु आणि आचार्य असा प्रवास होण्यासाठी कलाकारामध्ये एक जागृत आत्मा असावा लागतो, असे पंडिता शमाताई यांचा जीवनप्रवास उलगडून सांगताना पद्मश्री सुरेशजी तळवलकर यांनी सांगितले. कोणतीही समर्थपणे सादर केलेली कलाकृती ही कलाकाराच्या परंपरेची फलश्रुति असून ती कलाकाराच्या वैयक्तिक मालकीची नसते आणि हे जाणणारा कलाकार उच्च स्थानी पोहोचतो असे त्यांनी सर्वांना संबोधित करताना सांगितले.

रोटरी क्लब पुणे कोथरूडचे अध्यक्ष मनीष दीडमिशे यांनी रोटरी क्लब कोथरूडने आजपर्यंत केलेल्या आणि पुढील नियोजित सामाजिक प्रकल्प व उपक्रमांविषयी माहिती दिली. याप्रसंगी रोटरी प्रांत ३१३१ चे सह–प्रांतपाल रो.अतुल अत्रेव माजी प्रांतपाल रो. प्रमोद जेजुरीकर यांची विशेष उपस्थिती होती. तसेच नादरूप संस्था व ललित कला केंद्र येथील शिष्यार्थींची लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नियोजन रोटरी क्लब कोथरूडचे व्होकेशनल सर्व्हिस डायरेक्टर रो. राजेश भाटे, सचिव राहुल खांडेकर, क्लबच्या फर्स्ट लेडी मनीषा दीडमिशे, सभासद उर्मिला हळदणकर, सौ. स्वाती भाटेव सौ. अनिता खांडेकर यांनी केले. सौ. चंदना चितळे यांनी सूत्र संचालन केले. रोटरी क्लब कोथरूडच्या पुढील वर्षीच्या नियोजित अध्यक्षा रो. गायत्री लडकत यांनी आभार प्रदर्शन केले.

# अभ्यास कौशल्य कार्यशाळा

दरवर्षीप्रमाणे यंदाही अभ्यासकौशल्य कार्यशाळा एकूण सहा शाळांमध्ये १२ दिवस प्रत्येक दिवशी दोन तास अशाप्रमाणे आयोजित करण्यात आली. पावसामुळे दोन शाळात सलग झाले नाही, तरीही माझ्याबरोबरच्या समुपदेशकाच्या सहकार्यामुळे पुन्हा नवीन प्लॅन करून त्या दोन्ही शाळा पूर्ण केल्या. महत्त्वाचं म्हणजे ऑगस्ट ३ व ४ ला ह्या सर्व शाळांचे काम मनाला समाधान देणारं झालं. प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांचं प्रमाण कमी-जास्त होते. तरी सांगायला आनंद वाटतो की एकूण ७८० विद्यार्थ्यांना या कार्यशाळेचा लाभ मिळाला.

वनाझ शाळेत ९ वी, १० वी तर चंद्रकांत दरोडेमध्येही ९ वी, १० वी मुले सरस्वती विद्यामंदिर फक्त १० वी तसेच सेवासदन १० वी अणि भारतीय जैन संघटना वाघोली येथे तर ३५० केवळ १० वी चे घ्या असा त्यांचा आग्रह होता. काही शाळांमधील शिक्षक ही नवीन अभ्यासतंत्रे शिकण्यास उत्सुक होते. त्यामुळे तीन ते चार शिक्षक दोन्ही दिवस विद्यार्थ्यांच्या बरोबरीने उपस्थित होते. इतकेच नाही तर स्मरणतंत्राच्या काही ॲक्टिव्हिटीजमध्ये ते सहभागी होते. तुम्ही शिकवलेली अभ्यासतंत्रे आम्ही विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा आठवण करून त्याबाबत सहाय्य करू, सर्व शाळांतील प्रमुखांना आपला १० वीचा निकाल १००% लागावा ही मनापासून इच्छा, त्यामुळे त्यांनी भरपूर चांगला प्रतिसाद दिला. मुलांना वेळेचे नियोजन, वाचनलेखनाचे महत्त्व पटले. लक्षात कसं ठेवायचे याबाबत उदाहरणे यावर विद्यार्थी खूष होते. एकूण विद्यार्थ्यांचा हा प्रतिसाद पाहून आमचा उत्साह द्विगुणित झाला. पुन्हा असे सत्र घ्या असा त्यांचा आग्रह होता.

प्रत्येक शाळेसाठी काही पास्ट प्रेसिडेंट बोर्ड मेंबर्स उपस्थित होते. वनाज शाळेत रो. दाते यांनी उद्घाटन केले. रो. सिद्ध व सेक्रेटरी रो.राहुल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ज्ञानदा शाळेत पार्टनर उमेश यांनी संवाद साधला. सरस्वती विद्यामंदिर या शाळेत रो. नलगीरकर यांनी या प्रकल्पाविषयी माहिती दिली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना उत्फूर्तपणे मार्गदर्शन केले. सर्विस डायरेक्टर रो. सुषमा यांनी सेवासदन शाळेतील विद्यार्थिनींना या उपक्रमाचा हेतू सांगितला. या प्रकल्पासाठी प्रत्येक शाळेसाठी रोटेरियनस ॲन्स उपस्थित होते. सहाही शाळेत तज्ज्ञ मानसशास्त्रज्ञ रश्मी पटवर्धन, संध्या पाटील, अर्चन कुलकर्णी आणि रो. उर्मिला यांनी मार्गदर्शन गेले.

**– रो. उर्मिला हळदणकर**

# इंटरॅक्ट क्लब इंस्टॉलेशन





रोटरी क्लब ऑफ पुणे कोथरूड तर्फे दरवर्षी प्रमाणे विविध शाळांमध्ये इंटरॅक्ट क्लब इंस्टॉलेशन्स २०२४-२५ झाली. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या शिशुविहार प्राथमिक शाळेत ८ ऑगस्ट २०२४ ला सकाळी १० वाजता हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमासाठी RCPK चे प्रेसिडेंट मनीष दिडमिशे, युथ अँड वोकेशनल डायरेक्टर राजेश भाटे, PP वि जा रायकर, इंटरॅक्टचेअर पर्सन पार्टनर स्वाती भाटे, पार्टनर वसुधा पटवर्धन व शाळेच्या मुख्याध्यापिका शीतल इंगुळकर उपस्थित होते. मुलांनी बनवलेल्या राख्यांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. राख्या विक्रीस देखील ठेवल्या होत्या. नवनिर्वाचित अध्यक्ष शेयर्स पांढरे, सेक्रेटरी अनुष्का कांबळे, खजिनदार व इतर संचालक मंडळाचा पदग्रहण समारंभ संपन्न झाला.

दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी एरंडवणे माध्यमिक शाळेत दुपारी ११ वाजता नवीन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण कार्यक्रम उत्तम पार पडला. या कार्यक्रमासाठी RCPK च्या फर्स्ट लेडी मनीषा दिडमिशे, युथ अँड वोकेशनल डायरेक्टर राजेश भाटे, PP वि जा रायकर, इंटरॅक्ट चेअरपर्सन पार्टनर स्वाती भाटे, पार्टनर वसुधा पटवर्धन, पार्टनर भक्ती सिद्ध व शाळेचे मुख्याध्यापक कांगरे व तळेकर सर उपस्थित होते. दिनांक ३ सप्टेंबर २०२४ रोजी चारदकांत दरोडे शाळेत सकाळी दहा वाजता नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पदग्रहणाचा सोहळा उत्तम रितीनी पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन दीपप्रज्वलन व स्वागतगीताने झाली. मावळत्या व नवानिर्वाचित प्रेसिडेंट व सेक्रेटरींची भाषणे झाली. या कार्यक्रमासाठी RCPK च्या फर्स्ट लेडी मनीषा दिडमिशे, PP वि जा रायकर, इंटरॅक्ट चेअरपर्सन पार्टनर स्वाती भाटे, रो. हेमचंद्र दाते व शाळेच्या मुख्याध्यपिका आंत्रे उपस्थित होते.

**– पार्टनर स्वाती भाटे**

# शिक्षक दिन

४ सप्टेंबरच्या आपल्या साप्ताहिक सभा ही योगायोगाने शिक्षक दिनाची पूर्वसंध्या असल्याने प्रोग्रॅम कमिटीने एक छान कार्यक्रम आयोजित केला होता. रो. उर्मिलाताईंनी पाहुण्यांचे स्वागत केले. आपला क्लब दर वर्षी ज्या शाळांमध्ये मुलांसाठी काही उपक्रम करत असतो त्या शाळेच्या मुख्याध्यापकांना आपण आमंत्रित केले होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२४ या विषयावर शिशु विहार शाळेच्या मुख्याध्यापिका शीतल इंगुळकर, एरंडवणे शाळेचे मुख्याध्यपक श्री. किंगर व चंद्रकांत दरोडे शाळेच्या मुख्याध्यापिका श्री. सुनीता अंत्रे यांनी त्यांची मते व्यक्त केली. या धोरणातील फायदे तोटे त्यांनी मुद्देसूदपणे मांडले.

त्यानंतर शिक्षक दिनाच्या निमित्ताने सर्व आमंत्रित पाहुण्यांचा सन्मान शाल व श्रीफळ देऊन RCPK चे प्रेसिडेंट मनीष दिडमिशे यांच्या हस्ते करण्यात आला.

पार्टनर स्वाती भाटे यांनी आलेल्या पाहुण्याची ओळख करून दिली. फर्स्ट लेडी मनीषा दिडमिशे यांनी आभार प्रदर्शन केले.

आपल्या क्लब मधील काही सदस्य नेहमी शिक्षण क्षेत्रात RCPK च्या उपक्रमांमधून त्यांचे योगदान देत असतात. त्याची आठवण ठेवून या सगळ्यांचा कौतुक सोहळा देखील संपन्न झाला. त्यांची नावे खालील प्रमाणे

१. PP उज्वल तावडे
२. रो. उर्मिला हळदणकर
३. रो. वंदना दांडेकर
४. PP विश्वनाथ लेले
५. रो. विशाल सरदेशपांडे
६. रो. सुमेधा भोसले
७. पार्टनर नीता यादवाड.
८. रो. सत्यजित चितळे
९. पार्टनर उमेश कुलकर्णी
१०. रो. विशाखा वाघ.

कार्यक्रमानंतर फेल्लोवशीप कमिटीने ठेवलेल्या रुचकर जेवणाचा स्वाद सर्वांनी घेतला.

**– पार्टनर स्वाती भाटे**



**गजवदन चतुर्थी संकटी मोरयाची ।**
**पूजा बांधिली माणिका मोतियांची ।।**
**जुडी वाहिली पुष्प दुर्वांकुरांची ।**
**मनी ध्यायिली मूर्त मोरेश्वराची ।।**



## बदामाचा शिरा

साहित्य – एक वाटीभर बदाम चार–पाच चमचे साजूक तूप, अर्धी वाटी साखर, अर्धी वाटी दूध

बदाम नेहमीप्रमाणे रात्री भिजवून सकाळी साले काढावीत व मिक्सरवर ऑन ऑफ करत बारीक पूड करून घ्यावी.

बदामाचा वाटलेला गोळा तुपावर बदामी रंगावर भाजून घ्यावा. सतत हलवत राहावे नाहीतर खाली लागण्याची

शक्यतो नंतर त्यात दूध घालावे, एक वाफ आली की त्यात साखर घालावी व पुन्हा एकदा वाफ आणावी.

**- पार्टनर प्रतिभा कुलकर्णी**

# GENTS' PICNIC - 3/4 AUGUST, 2024



We are always anxiously awaiting every year for the Gents' Picnic when the Rotary Year commences. It usually takes place in July before Shrawan starts and is invariably planned with an overnight stay.

Our Fellowship committee takes the initiative to plan it and this year PP Rtn. Girish Kshirsagar alongwith the evergreen Rtn.Chandu Date led from the front in organising the picnic spot, food choice, travel arrrangements and planning the day's programme.

The GULMOHOR Village Resort, located on a hilltop near Panshet backwater, is a wonderful campus spread over in a vast area with swimming pool, rain dance facility, Garden with variety of beautiful flowers, indoor game facility, Gazebo, spacious rooms, dining halls and Scenic beauty of nature

We were a total of 16 members and all of us reached in pooled cars around 11.30 am directly at the venue and thereafter began our enjoyment in true spirit. It was a pleasure that our two new members Rtn.Vishal Sardeshpande and Rtn. Dr.Arun Gautam were part of our picnic team. This helped in inter acting with them with more freedom, unravelling their talents and qualities.

The continuous pouring of rain throughout the day to some extent restricted our outdoor movements, walking exercise and we were compelled to engage in indoor activities along with gossiping, sharing knowledge and discuss the rotary future. The musical evening was even more pleasant with emergence of new singers like Rtn.Vishal along with other seasoned members, namely PP Rtn. Sanjay Runwal, PP Rtn. Girish Kshirsagar and self. The surprise members were PP Rtn. Dr. Ravi Kulkarni & Rtn. Suhas Patwardhan. Others provided a wonderful korus making the evening memorable & colourful. We definitely missed the presence though of Rtn.Heramb and Rtn.Gururaj ,

The food was delicious and the choice and quality was notable.

Since the raining was continuous and apprehension of road blocks, we thought it fit to depart early after breakfast. We left the place at 9.30 am next day, but not without carrying a whole lot of wonderful memories with us.

- **PP Rtn. Vasant Kulkarni**

# पुस्तक परिचय

**साथ साथ - The Silent Defenders**
लेखिका - सानिका बापट
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि .
प्रथम आवृत्ती - ३१ मार्च २०१४




सानिका बापट खाडिलकर यांनी ह्या पुस्तकाची अर्पणपत्रिका अतिशय समर्पकपणे लिहिली आहे. पुस्तकाच्या नावाला खूपच साजेशी आहे. मला खूपच आवडली. तुम्हालाही ही अर्पणपत्रिका नक्कीच भावेल ह्याची मला खात्री आहे.

आपल्या सैनिक पतीला, वीर योद्ध्याला हसतमुखाने, समर्पित हृदयाने साथ देणाऱ्या त्या प्रत्येक सैनिक पत्नीला समर्पित.....

सानिका बापट आणि जनार्दन ऊर्फ अनिकेत खाडिलकर हे दोघे चौथी इयत्तेत, एक वर्षभर, एकाच बाकावर बसायचे. त्यानंतर ते दोघे भेटले - तब्बल पंधरा वर्षांनंतर आणि मग माझा तो जिवलग बनला - असे सानिका म्हणतात.

Nation First, Duty First प्रत्येक सैनिक ही शपथ घेतो. ह्या शपथेला व आपल्या सैनिक पतीला मनापासून साथ द्यायला जर सैनिक पत्नीला जमले तरच त्यांचा संसार सुखाचा होतो असे प्रतिपादन सानिका करतात. आपल्यापेक्षा त्याच्या आयुष्यात आधीच काहीतरी अतिशय महत्त्वाचे आहे जाणणे आणि त्याबद्दल प्रेम, आनंद आणि अभिमान असणे हे खूप महत्त्वाचे. किंबहुना त्यामुळेच अधिकाधि क स्वतंत्र आणि खंबीरपणे एकटीने निर्णय घेणे आणि ते निभावणे हे जमू लागते. इतर कोणाच्या मदतीशिवाय आणि एकत्र असतानाही रोजच्या दिनक्रमात त्याला गृहीत न धरता आपल्या मुलाबाळांसकट स्वतःचीही सकारात्मक वाढ करणे हे प्रशिक्षण होत जाते. म्हणूनच सैनिकांच्या पत्नींना Army Beyond Army, Silent Ranks, Rear Guards, Silent Defenders अशी अनेक संबोधने दिली जातात ती अगदी समर्पक वाटतात.

जनार्दन खाडिलकर यांची फौजी जीवनाची सुरुवात २००१ साली इंडिअन मिलिटरी अकादमी Indian Military Academy - I. M. F. डेहराडून येथे झाली. त्यांनी कोर ऑफ सिग्नल्स निवडले. म्हणून श्री. जनार्दन खाडिलकर हे सिग्नल्सचे आर्मी ऑफिसर बनले. सिग्नल्सचे काय काम? ते म्हणजे पायदळ, तोफखाना आणि दारुगोळा, रणगाडा दल यांना सर्व प्रकारची संदेशवहनाची व्यवस्था देणे, त्यासाठी लागणारे आधुनिक तंत्रज्ञान शिकणे, आत्मसात करणे आणि ते प्रभावीपणे वापरणे.

सतरा वर्षातील सैन्यातील आयुष्यामध्ये सानिका त्यांच्या पतीसोबत आणि त्यांच्या मुलीला, मुक्ताला घेऊन, भारतातील ९ राज्यांमध्ये १० ठिकाणी राहिल्या.

सैनिकी अधिकाऱ्याची पत्नी जेव्हा लग्न करून छावणीत राहायला जाते तेव्हा ती सुद्धा सेनेच्या परिवाराचा अविभाज्य हिस्सा बनते. तिच्यावर काही अलिखि त जबाबदाऱ्या असतात व ती त्या पार पडणार हे गृहीत धरलेले असते.

कोविड काळामध्ये श्री. खाडिलकर यांचे पोस्टिंग अमृतसर येथे कमांडिंग ऑफिसर म्हणून होते. तेव्हा स्वतःची काळजी न करता, पतीच्या खांद्याला खांदा देऊन युनिटच्या कुटुंबियांची वैयक्तिक, शारीरिक आणि मानसिक देखभाल केली. आर्मीचे आयुष्य कष्टाचे असते परंतु लेखिकेने त्याकडे दुर्लक्ष केले व ह्या आयुष्यातून काय घेण्यासारखेआहे, काय शिकण्यासारखे आहे ह्यावर जोर दिला.

ह्या पुस्तकात १३ लेख आहेत. प्रत्येक एकाहून एक सरस, माहितीपूर्ण, उत्कंठावर्धक, अतिशय वेगळा अनुभव देणारा.

माझी रोटरी क्लबमधील मैत्रीण चंदना चितळे हिने मला हे पुस्तक वाचायला दिली. मी तिची अतिशय आभारी आहे.

**- पार्टनर नीता यादवाड**
०६/०८/२०२४

# जनसंपर्क

पुण्यामध्ये गणपती उत्सव मोठ्या उत्साहात सुरु झालाय. ह्या उत्सवातुन जन जाग्रुती व्हावी अशी लोकमान्य टिळकांची इच्छा होती. जगभरात मोठ्या प्रमाणात लोकसेवेच कार्य करणाऱ्या रोटरी संस्थेनी ह्या निमित्तानी जनजागरुतीला हातभार लावला. 'रोटरी क्लब पुणे कोथरुड'नी अखिल मंडई मंडळाच्या गणपती उत्सवाच्या मंडपात रोटरीच्या कामांची माहीती देणारे बॅनरचे अनावरण केले. त्यानंतर डिस्ट्रीक्ट गव्हर्नर रों. श्री. शितल शहा ह्यांच्या हस्ते आरती केली. ह्या प्रसंगी रोटरी क्लब कोथरुडचे अध्यक्ष रो. मनिष डिडमिशे, डायरेक्टर हेमचंद्र दाते व इतर माननीय सभासद ऊपस्थित होते. सर्व मान्यवरांचा सत्कार अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष श्री. अण्णा थोरात यांनी केला. रोटरी क्लब पुणे कोथरुड तर्फे रोटरीच्या कामांची माहीती देणारे बॅनर १० प्रमुख जागी लावण्यात आले. गणेशोत्सवाच्या निमीत्तानी रोटरीच्या कामांची माहीती जनतेपर्यंत पोचावी आणि जनजागरुती व्हावी हीच प्रार्थना!

**– रो. हेमचंद्र दाते**










# बोरघर-घोडनदी-शंकर आणि हलाहल : साक्षरता वर्ग उद्घाटन १ सप्टेंबर २०२४

गिरीकंदरात वास्तव्य करणाऱ्या विष्णुस्वरूप महादेवाला दंडवत मंचरच्या वेशीला स्पर्श करून भीमाशंकराकडे जाणाऱ्या रस्त्यावर मन्चरची भाजी मंडई आहे, ती संपताच डावीकडे दिसणारा हा बोर्ड, शेजारच्या बंगलीच्या सीमाभिंतीच्या कामामुळे आता थोडासा कललेला.

१ सप्टेंबर च्या सकाळी तिथून जाताना आम्हाला कल्पनाही नव्हती कि याच विष्णुस्वरूप शिवाची आज भेट होणार आहे. निमित्त होते बोरघर इथे सुरु होणाऱ्या प्रौढ साक्षरता वर्गाच्या उद्घाटन समारंभाचे. घोडेगाव स्थित आदिम संस्कृती व मानव विकास अभ्यास संशोधन संस्था या संस्थेच्या प्रयत्नातून दर वर्षी कातकरी, आदिवासी वस्तीमध्ये साक्षरता वर्ग चालवले जातात. आमचा रोटरी क्लब पुणे कोथरूड गेली ९ वर्षे यातील काही वर्ग प्रायोजित करतो. यंदाच्या वर्षी बोरघर गावाच्या तीन वर्तीमध्ये चालवले जाणारे वर्ग आम्ही प्रायोजित करण्याचे ठरविले आणि रोटरी इंटरनॅशनल ने ठरविलेल्या मूलभूत शिक्षण आणि साक्षरता महिन्याच्या पहिल्याच दिवशी, अर्थात १ सप्टेंबर ला हा योग जुळून आला. या कार्यक्रमासाठी क्लबमधील रो. उज्वल तावडे, सौ. उज्वलाताई तावडे रो. वसंतराव कुलकर्णी, रो. हेमचंद्र दाते, रो. प्रशांत सिद्ध, आमचे या वर्षीचे अध्यक्ष रो. मनीष दिडमिशे, सौ. मनीषा दिडमिशे, रो. उर्मिलाताई हळदणकर आणि मी असे ९ जण दोन वाहनातून सकाळी लवकर निघालो.

नाशिक रस्त्यावरचा गर्दीचा थरार अनुभवत आणि नेहमीच्या आवडत्या उपहारगृहात गर्दीमुळे हुकलेल्या प्रवेशाच्या संधीमुळे हळहळत आम्ही सुमारे ११ वाजता घोडेगाव गाठले. आदिम संस्थेचा समीर गाडे हा कार्यकर्ता आमच्या बरोबर काही इतर जणांना घेऊन येणार होता. त्याने डिंभे गावापर्यंत यायला सांगितले. घोड नदी काठाने जाणारा हा वळणाचा रस्ता तसा परिचित. सालाबाद प्रमाणे होणारा खांडस- भीमाशंकर ट्रेक या वर्षी हुकल्यामुळे या वर्षी माझी इथली वारी झाली नव्हती, ती या योगाने जुळून आली. डिंभे खुर्द पाशी समीर ची भेट झाली आणि त्याने त्यांच्या गाडीच्या मागे यायला सांगितले. डिंभे पासून पाउण एक तास लागेल असे त्याने सांगितले आणि हा आपल्याला आता कुठे नेतो याची चर्चा करीत आम्ही त्याच्या मागे निघालो.

डिंभे गावानंतर लगेच उजवीकडे धरण आणि लघु जलविद्युत प्रकल्पाकडे जाणारा रस्ता आम्ही पकडला. समोर डिंभे धरणाची विशाल उंच भिंत दिसत होती. तब्बल २२ वर्षे बांधकाम झालेल्या आणि १३.५० दशलक्ष घनमीटर क्षमतेच्या या धरणाच्या बंद दरवाज्यांच्या फटीतून गळणाऱ्या पाण्याच्या धारा लाटांसारख्या भिंतीच्या उतारावरून पालवत नदीच्या पात्रात विसर्जित होत होत्या. त्यावरून या विशालकाय भिंतीमागे किती पाणी आता अडले असेल याची कल्पना येत होती. रस्त्याने भिंतीसमोरचा पूल ओलांडला आणि नदीच्या डाव्या किनाऱ्यावर चढाचा मार्ग पकडला. थोडीच वळणे मागे टाकत आम्ही धरण भिंतीच्या उंची पर्यंत चढून आलो आणि मागे विस्तीर्ण हुतात्मा बाबू गेनू जलाशय दिसू लागला. बोरघर ११ किमी अशी पाटी दिसली आणि या जलाशयाला तीन चतुर्थांश वळसा घालणारा आमचा मार्ग जलाशयाच्या काठाने जाताना दिसू लागला. रस्ता दुहेरी आणि चांगला होता, गर्दी तुरळक, हवा निर्मळ आणि वातावरण अतिशय आल्हाददायक अशी जोड मिळाली कि प्रवास कसा आनंददायक होतो. त्यातून पावसाने चिंब भिजलेला आणि गात्रे तृप्त झालेला निसर्ग सभोवती असला म्हणजे अगदी पर्वणीच. उजवीकडेच्या डोंगर उतारावर सागाची विपुल झाडी, त्यांची मोठाली पाने आणि श्रावणाच्या शेवटी काहीसा अवेळीच आलेला त्याचा फुलोरा, वास्तविक भाद्रपद संपताना येणारा. रस्त्याने बाजूला फुललेली गुलाबी तेरड्याची रोपे तीही थोडी अगोदरच फुललेली परंतु सुंदर आणि मोहक,

थोड्याच वेळात बोरघर गाव आले. कालकथीत झालेल्या एका हनुमान मंदिराची पडकी भिंत डावीकडे लागली आणि लगेच जिल्हा परिषद न्यू इंग्लीश स्कूल बोरघर ची बैठी इमारत दिसली. बोरघर कडे डावीकडे जाणाऱ्या रस्त्याला तसेच सोडून आमच्या गाड्या पुढे चढाच्या रस्त्याला लागल्या. इथून वर उंचावर दिसणाऱ्या एका मंदिराकडे बोट दावित कार्यक्रम तिथे आहे असे समीर म्हणाला. फार नाही फक्त ६ किमी घाट चढून गेल्यावर येणारी तीच ती उंबर वाडी.

वळणा वळणाचा तीव्र चढाचा रस्ता, बिगर कठड्याचा. मुळात कधी तरी रोहयो मध्ये बांधलेला असावा. कुठे उखडलेला, कुठे मुरूम पांघरलेला. त्यावरून कधी गाडीची चाके नुसतीच गोल गोल फिरली, या रस्त्यावरून जायला असलेला विरोध दर्शवित ! वाटेत बोरघर वा धबधबा लागला. गेले चार पाच दिवस पावसाने उसंत घेतल्यामुळे पाण्याची धार रोडावलेली, परंतु त्याच्या समोरून जाताना त्याच्या विशाल कातळ भिंतीवरून खाली झेपावणारे पाणी किती सुंदर दिसत

असेल याची कल्पना आली. गुगल ला हे ठिकाण माहित आहे हे मॅप वरून दिसून आले!

सुमारे १५ मिनिटात आम्ही अदमासे ४५० मीटर्स उंची चढून आलो. वरच्या वरसुबाई चे मंदिर आणखीन उजवीकडे उंचीवर ठेवत डोंगराच्या खांद्यावरून प्रदक्षिणा करणाऱ्या मार्गाने आम्ही उंबर वाडीकडे निघालो. वाटेत आवळे वाडी लागली, एक साक्षरता केंद्र इथे सुरू होणार आहे. तिथून फार नाही पण दोन एक किलोमीटर्स वर उंबर वाडी, ईन मीन दहा पंधरा घरांची वाडी. उंचावरून खाली नजर टाकल्यावर दिसणारी भाताची पायऱ्या-पायऱ्याची शेते. दूरवर दोन डोंगर सोन्डीतून दिसणारा पावसामुळे फुगलेला हुतात्मा बाबू गेनू जलाशयाचा नितकोर तुकडा, डोंगराच्या उतारावरून वाहणारे छोटे छोटे शुभ खळखळणारे ओढे अन तिथे आमची वाट पाहत थांबेलेले ग्रामस्थ. आमची वाहने तिथे पोचली, नमस्कार झाले आणि शुद्ध हवा फुफुसात भरून घेत आम्ही थोडे खाली उताराने उतरून नवीनच रंगकाम केलेल्या मंदिराकडे निघालो. आधी लागली ती तिथली प्राथमिक शाळा आणि अंगणवाडी. डोंगराच्या कुशीत, उताराला लागूनच्या वस्तीत बांधलेली, माफक पण स्वच्छ अंगण, बैठी इमारत सहा सात वर्ग खोल्यांची. समोरच क्रांती ज्योती सावित्रीबाई यांचे मोठे तैलचित्र, दोन वर्गाच्या मध्ये भिंतीवर असलेले माहिती फलक ज्यावर पुणे जिल्ह्याचा नकाशा, ऋतुचक्राचे सप्तरंगी चक्र, आपली ग्रहमाला अशी व्यवस्थित माहिती रंगवलेले. विशेष म्हणजे इथल्या ग्रहमालेत गुरुला सुद्धा कडी दाखवलेली दिसली अगदी आता आता लागलेल्या शोधाची माहिती इथेही पोचली आहे तर ! शाळेचे छत पत्र्याचे त्यावर लावलेली सोलर ची तावदाने बघून छान वाटले. एकात्मिक बालविकास सेवा योजना अंगणवाडीच्या बाहेर एक बोर्ड होता. अंगणवाडी या शॉर्ट फॉर्म चे पूर्ण निवेदन करणारा, तो असा अं: अंगावरच्या दुधाचे महत्व पटवून देणारी, गः गमभनच्या अगोदरची पूर्वतयारी: णः बाण मारून लसीचा, बालकांच्या शत्रूचा नायनाट करणारी वा वाल्या कोळ्याचा वाल्मिकी घडवणारी : डी: डीवचणारी कुपोषण व बालमृत्यूला आळा घालणारी. या एकाच फलकाने इथल्या वस्तीतल्या मूलभूत समस्यांची माहिती आपोआपच झाली.

मग पावले मंदिराकडे वळली. नुकताच ओईल पेंट ने रंगवलेला कळस असलेले मंदिर त्यापुढे सभामंडप. शंभर एक माणसे बसू शकतील इतका मोठा. तिथे आवळे वाडी, उंबर वाडी आणि पुढची कोळ वाडी इथले ग्रामस्थ जमलेले. आमच्यासाठी मांडून ठेवलेले बाक आणि समोरच्या स्वच्छ सतरंजी वर बसलेले बरेचसे वृद्ध पुरुष आणि आजच्या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने आलेल्या महिला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आदिम संस्थेचे कार्यकर्ते राजू घोडे यांनी प्रास्ताविक केले. गेली काही वर्षे राजू यांच्या संपर्क आहे.द्वि-पदवीधर असलेला राजू याचं गावाचा. कष्टातून शिकून नुकताच बोरघर ची निवडणूक जिंकून उप-सरपंच झालाय. त्याने साक्षरता वर्गाचे महत्व, शासन योजना लाभार्थींच्या दारी पोचण्यासाठी त्याची असलेली कळकळ आणि धडपड चांगली विशद केली. आमच्या क्लबचे अध्यक्ष मनीष याने रोटरी विषयी माहिती सांगून या उपक्रमाविषयी असलेली बांधिलकी समजावून सांगितली. रो. उर्मिलाताईचे बोलणे सर्वांनाच आणि विशेष म्हणजे महिला वर्गाला आवडून गेले. आता मी सही करणार, बँकेत पैसे भरायला गेल्यावर माझी मीच स्लीप भरणार या त्यांच्या ठसक्यात सांगितलेल्या वाक्यावर समोरच्या महिला वर्गाच्या चेहऱ्यावर समाधानाचे आणि आत्मविश्वासाचे हसू फुलले. या साक्षरता वर्गात शिक्षित झाल्यामुळे आपल्या नातवंडाना सुद्धा आपला आजा किंवा आजी सुद्धा या वयात काही करून दाखवू शकते असा विश्वास वाटेल आणि चांगले संस्कार घरापर्यंत पोचतील असा विषय रो. प्रशांत ने मांडला. तुमचे नाव आणि वय काय असा प्रश्न रो. उज्ज्वल ने ज्यांना विचारले त्या रोहिदास यांना आपले वय सांगता आले नाही. किंबहुना त्याची काय गरज आहे असाच प्रश्न त्यांना पडलेला दिसला. आधार कार्ड दाखवतो त्यावरून तुम्हीच माझ्या वयाचे गणित करून सांगा असे म्हणत त्यांचा हात बंडीच्या खिशाकडे गेला. आकडेमोड करण्याचे शिक्षण नसलेल्या या लोकांची व्यवहार चतुरता मोडीत निघालेली असणार.

अक्षर- अंक ओळखीपासून अज्ञ असणारा हा वर्ग आदिम संस्थेचे कार्यकर्ते आणि या वर्गाचे संयोजक समीर, स्नेहल, वैशाली, राजू यांच्या सारख्यांच्या पाठपुराव्यामुळे इथवर काही अपेक्षेने आला होता आणि आम्ही त्यांना प्रोत्साहित करू शकलो हे आमचे भाग्यच.

इथून जरा उत्तरेकडे डोंगर ओलांडून गेलो कि कुकडी चे खोरे आणि नाणेघाट परिसर. सुमारे दोन सहस्त्र वर्षांपूर्वीचा समृद्ध प्रदेश. वायव्येकडे दर्या घाट ही ढाकोबा दुर्गाकडे उतरणारी वाट. शतकानुशतके इथे वास्तव्य करून राहिलेला हा मुळात क्षत्रिय समाज, मुलतः महादेव कोळी वंशाचा (असावा... किमान इंटर नेट तशी माहिती पुरविते) आम्ही तिथे असताना याची चौकशी कटाक्षाने टाळली कारण आधुनिक समाजाच्या दिशेने जाताना जी गोष्टी पुसणे आवश्यक वाटते ती आपल्या तोंडाने दुसऱ्याला पुसायची कशाला!

उद्योग व्यवसाय आणि त्यामुळे येणारी स्थिरता व संपन्नता या गोष्टी खाली खोऱ्याच्या सखल जागी गेल्यावर हळू हळू इथल्या पुढच्या पिढ्या इथून खाली घोडेगाव, मंचर भागात स्थिरावल्या आहेत. उंबर वाडीच्या ज्या प्राथमिक शाळेत शिकून राजू घोडे पुढे जात वी-पदवीधर झाला तिथे एके काळी ५०-५२

मुले असत, आता ती संख्या १०–१२ वर आली आहे. तरी पण हे लोक इथेच राहिले आहेत, त्यांचे देव इथेच आहेत, वर्षातून एकवार पीक देणारी चतकोर शेती इथेच आहे म्हणून नव्हे..... तर वर वर शांत आणि तलम दिसणाऱ्या या सामाजिक वस्त्राची वीण एकसंध नाही म्हणून, कदाचित. या सामाजिक व्यवस्थेच्या अस्तरा खाली विषमतेचे निखारे आहेत हे निरखून पाहणार्याला जाणवू शकते. इथले देव पावतात का? हा प्रश्न मी विचारला नाही, ते पावतात हि श्रद्धा असणारच, कारण नवस बोलणे आणि तो फेडणे हे इथली सामाजिक रूढी आहे. आणि हे देव कोपतात सुद्धा ही श्रद्धा बसायला या डोंगर सोंडेच्या पलीकडेच माळीण गाव आणि तिथल्या गेल्या दशकातल्या नैसर्गिक विध्वंसाची आठवण आहे. आदर्श पुनर्वसित गाव माळीण हि इथे येताना दिसणारी पाटी यासाठी पुरेशी आहे.

डोंगर उतारावरच्या या वस्त्यांमध्ये पाण्याची काय व्यवस्था असा प्रश्न केला तेव्हा न आटणाऱ्या विहिरी असे उत्तर मिळाले. घाट वाट चढून येताना काही नवीन बांधलेल्या आणि काही जुन्या विहिरी दिसल्यासुद्धा. डिंभे धरणात कुबेराच्या मापाने पाणी भरणाऱ्या या जलस्त्रोतांच्या परिसरात नजीकच्या काही काळापूर्वी उन्हाळ्यात रखरखीत डोंगर माथ्यावरून डोक्यावर पाण्याच्या हंडे भरून जाण्यार्या महिलांचे चित्र लगेचच डोळ्यासमोरून तरळून गेले. इथल्या विहिरींवर रहाट गाडगे दिसले नाही परंतु त्या गर्दीत बसलेल्या हंसाबाई, गंगाबाई च्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्यांनी त्यांच्या जगण्याच्या रहाट गाडग्याची कुरकुर न सांगताच ऐकवली.

इथून शिकून बाहेर पडून सगळे आयुष्य मुंबई मध्ये महाराष्ट्र बँकेत नोकरी केलेले आणि मग पुन्हा ग्रामविकासाच्या ओढीने इथे परत आलेले श्री. गाडे यांची इथेच ओळख झाली. आपल्या प्रगतीचा मार्ग चोखाळत शहराकडे वाटचाल करण्याचा सामान्य क्रम सोडून मागे पुन्हा गावाकडे परतलेल्या या सर्वांच्या जिद्दीचे आणि तळमळीचे आम्हाला विशेष कौतुक वाटले.

उंबरवाडीचा कार्यक्रम संपला. समोर गाभाऱ्यातून आमच्याकडे पाहणाऱ्या विठ्ठलाच्या आणि रखुमाईच्या सालंकृत पाषाणमूर्तींला नमस्कार केला. एका बाजूस ज्ञानेश्वर माउली आणि एका बाजूला तुकोबारायाची प्रसन्न मूर्ती इथल्या मातीत रुजलेल्या वैष्णव संत विचारांची ओळख करून देत होत्या. निघताना राजू घोडे, स्नेहल, वैशाली, समीर सर्वांची हृदय भेट आणि निरोप घेतला. इथे वसलेल्या शिवाच्या कंठातील हलाहलाचा दाह कमी करण्याच्या त्यांच्या प्रयत्नात खारीचा वाटा आपल्याला उचलता आला हे इवलेसे समाधान मनात ठेवूनच !

**– पीपी रो. सत्यजित चितळे**

**०५ सप्टेंबर २०२४**




**Sept 01 Gururaj Joshi**
**Sept 13 Indraneel Muchgule**
**Sept 13 Sameer Potnis**
**Sept 16 Umesh Kulkarni**
**Sept 21 Pratibha Runwal**
**Sept 24 Manisha Didmishe**
**Sept 27 Pratap Rege**
**Sept 27 Rucha Ambekar**
**Sept 30 Anita Khandekar**

**For Private Circulation Only**
**Editor :** Ann Rekha Pandit
**Bulletin Committee Member :**
Ann Neeta Yadwad, Rtn Prakash Jog, PP Rtn Vasant Kulkarni, Ann Chandana Chitale